## जनसंपर्क विभाग

बातमी - १

जळगाव दि.२० ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या यापूर्वी जाहीर झालेल्या जिल्हास्तरीय युवक महोत्सवांच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे.

यापूर्वी जाहीर झालेल्या युवक महोत्सवाच्या काळात विधी व शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षा येत असल्यामुळे नवीन तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. एरंडोल विभागाचा महोत्सव 5 जानेवारी ऐवजी 28 जानेवारी रोजी बी.पी.कला,एस.एम.ए. विज्ञान व केकेसी वाणिज्य महाविद्यालय चाळीसगाव येथे होणार आहे. जळगाव विभागाचा 7 जानेवारी रोजी जी.एच.रायसोनी इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, शिरसोली रोड, जळगाव येथे होणारा महोत्सव आता 1 फेब्रुवारी रोजी याच ठिकाणी होईल.

कुसुंबा येथील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात धुळे जिल्हयाचा 9 जानेवारी रोजी होणारा महोत्सव आता 4 फेब्रुवारीला होणार आहे. तर तळोदा येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे नंदुरबार जिल्हयाचा 11 जानेवारी रोजी होणारा युवक महोत्सव आता 6 फेब्रुवारीला होणार आहे. या जिल्हास्तरीय युवक महोत्सवातील कला प्रकारनिहाय प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिके प्राप्त महाविद्यालयांचा विद्यापीठस्तरीय युवक महोत्सव फेब्रुवारीत विद्यापीठात होणार आहे. या महोत्सवाच्या तारखा लवकरच जाहीर होतील अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे यांनी दिली.

-------

बातमी - 2

जळगाव दि.२० ( ) राष्ट्रीय गणित दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा गणित विभाग आणि मुळजी जेठा महाविद्यालय यांच्या वतीने शनिवार दिनांक २२ डिसेंबर रोजी मुळजी जेठा महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय गणित दिनासाठी विज्ञान प्रसार आणि विज्ञान व तंत्रज्ञान विभाग भारत सरकार यांच्याकडून अनुदान प्राप्त झ ाले आहे. मु.जे.महाविद्यालयात शनिवारी सकाळी विद्यापीठाच्या गणित विभागातील विद्यार्थी तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यकम होणार आहे. कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिन देखील यावेळी साजरा केला जाणार आहे. श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनावरील चित्रफित तसेच गणितात त्यांनी दिलेल्या योगदानाचे भित्तीपत्र प्रदर्शन यावेळी आयोजित करण्यात आले आहे. प्रा.एस.टी.बेंद्रे, प्राचार्य उदय कुलकर्णी आणि गणित विभाग प्रमुख प्रा.एस.आर.चौधरी हे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

-------

बातमी - ३

जळगाव २० ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षांतर्गत मोरया ग्लोबल लिमिटेड या कंपनीकरीता दि. २७ डिसेंबर, २०१८ रोजी सकाळी ९.३० वाजता खुल्या परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे.

पान २ वर

केमिकल इंजिनिअरींग, एम.एस्सी (केमिस्ट्री) असलेल्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या पदांसाठी जागा निघालेल्या आहेत. यासंदर्भात सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. इच्छुक व पात्रताधारक विद्यार्थ्यांनी https://www.nmu.ac.in/tpcell/en-us/tpchome.aspx या संकेतस्थळावर भेट द्यावी आणि पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर नोंदणी करूनच दिलेल्या तारीख आणि वेळेवर विद्यापीठाच्या प्लेसमेंट विभागात सर्व कागदपत्रांसोबत उपस्थित राहण्याचे आवाहन केंद्रीय व प्रशिक्षण नियुक्ती कक्षा मार्फत करण्यात आले आहे.

---

जा.क्र. कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. २० डिसेंबर, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी